पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# व्यवस्थापन परिषदेच्या १४७ व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
# शुक्रवार, दि. ०७ ऑक्टोंबर, २०२२ सकाळी ११:०० वा.

**प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १४७ वी बैठक शुक्रवार, दि. ०७ ऑक्टोंबर, २०२२ रोजी सकाळी ११:०० वा.** व्यवस्थापन सभागृहामध्ये मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. राजेश गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | डॉ. अ. उ. उबाळे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ४) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी (निमंत्रित) | निमंत्रित |
| ५) | डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (निमंत्रित) | निमंत्रित |
| ६) | श्रीमती योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य-सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

## स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच डॉ. राजेश गादेवार, प्र-कुलगुरु व श्रीमती योगिनी घारे, कुलसचिव यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा.कुलगुरु महोदय यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

## अभिनंदन:

दि. ०६ आक्टोंबर, २०२२ रोजी महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचेसोबत ०२ सामंजस्य करार (MoU) केलेले आहेत, यामध्ये विशेष बाब म्हणजे काही विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार झालेले आहेत परंतु, एका विद्यापीठाबरोबर ०२ सामंजस्य करार हा बहुमान फक्त आपल्या विद्यापीठाला मिळाला असल्याने त्याबद्दल मा.कुलगुरु व विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन करण्यात आले.

## अनुपस्थिती:

डॉ. धनराज माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.**

विषय क्र.१ **दि. १८ जुलै, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या दि. १८ जुलै, २०२२ रोजी झालेल्या १४६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | **दि. १८ जुलै, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.** |

**विषय क्र.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४(६)(जे) नुसार, मा.कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४(६)(जे) नुसार, मा.कुलसचिव यांनी विद्यापीठाचा प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन माहे दि. ०१ जानेवारी, २०२२ ते ३० जून, २०२२ या कालावधीतील कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| ठराव : | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, कुलसचिव यांनी सादर केलेल्या विद्यापीठाच्या दि.०१ जानेवारी, २०२२ ते ३० जून, २०२२ या कालावधीतील सहा महिन्यांच्या विकास कार्यक्रम अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.३ प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि. ०१ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रदान करण्यात आलेल्या विविध पुरस्कारासाठी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने, मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दि. ०१ ऑगस्ट रोजी विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणाऱ्या सदर पुरस्कारासाठी दि. ०५, ०६ व ०८ जुन, २०२२ रोजी अनुक्रमे दै. तरुण भारत, दै.सांझ व दै.संचार या वर्तमानपत्रामध्ये जाहीर आवाहन करण्यात आले होते. प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. ३०/०६/२०२२ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती. त्यानुसार विद्यापीठाकडे प्राप्त विविध प्रस्तावांतून प्रत्येक पुरस्कारासाठी स्वतंत्र निवड/शिफारस करण्यासाठी समितीचे गठन मा.कुलगुरु महोदया यांच्या मान्यतेने करण्यात आले होते.

सदरील विविध पुरस्कार हे दि. ०१ ऑगस्ट, २०२२ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनी द्यावे लागणार असल्याने व सदर पुरस्काराचे ट्रॉफी व साल्वर हे लवकर तयार करुन घ्यावे लागणार असल्याने त्याकरीता होणारा विलंब विचारात घेता तातडीची बाब म्हणून सदर पुरस्काराकरीता समितीच्या निवड / शिफारस अंती खालीलप्रमाणे विविध पुरस्कारासाठी अंतीम निवडीस मा. कुलगुरु महोदया यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मान्यता दिली आहे. सदरील पुरस्कार दि. ०१ ऑगस्ट, २०२२ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनी आयोजित समारंभात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिन विविध पुरस्कार २०२२

| अ. क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्कार प्राप्त उमेदवार, महाविद्यालय/संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १) | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवन गौरव पुरस्कार | श्री. किशोर श्रीवल्लभ चंडक |
| २) | उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार | एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी |
| ३) | उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार | प्राचार्य डॉ. शंकरराव किसनराव पाटील बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी |
| ४) | उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार | डॉ. माया जगदीश पाटील सामाजिकशास्त्रे संकुल, प्रस्तुत विद्यापीठ |
| ५) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार | श्री. गिरीश अनंत कुलकर्णी, विद्यापीठ अभियंता, प्रस्तुत विद्यापीठ |

पुरस्कार समितीच्या शिफारशीनुसार विविध पुरस्कारांसाठी वरीलप्रमाणे अंतिम निवडीस मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि. ०१ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रदान करण्यात आलेल्या विविध पुरस्कारांसाठी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने, मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**[ ०४ ] शै.वर्ष २०२२-२३ पासून संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात प्रथम वर्षास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची पात्रता कामी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तपशील महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांच्याकडून प्रति विद्यार्थी रु.१०/- प्रमाणे करुन घेण्यास, मा.कुलगुरु महोदया यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये दिलेली मान्यता माहितीस्तव.**

टिपणी: प्रत्येक शैक्षणिक वर्षात विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्याची अंतिम पात्रता करणेकामी त्यांचे बारावी उत्तीर्ण गुणपत्रिका, बैठक क्रमांक इ. महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांच्याकडे पडताळणीसाठी अग्रेषित केले जाते.

१. त्यांच्याकडून पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे अंतिम पात्रतेची कार्यवाही करण्यात येते.

२. व्यवस्थापन परिषद ठराव क्र. २८(७), दि.२१/०८/२०१८ अन्वये बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तपशील पडताळणीकामी रु.५/- प्रती विद्यार्थी शुल्क महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांना आदा करण्यात येत आहे.

३. श्री. हेमंतकुमार रजपूत, महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांनी दि.१९/०७/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तपशील तपासणी शुल्क कार्यकारी मंडळाच्या दि.१२/०५/२०२२ रोजीच्या निर्णयानुसार प्रती विद्यार्थी रु. ५ /- वरुन रु. १०/- केले असल्याचे कळविले आहे.

४. शै.वर्ष २०२२-२३ पासून संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांची बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तपशील तपासणीकामी रु. १० /- प्रती विद्यार्थी प्रमाणे शुल्क आदा करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

५. व्यवस्थापन परिषदेची मुदत संपल्याने, तसेच निवडणूकीच्या प्रक्रियेनंतर व्यवस्थापन परिषद नव्याने गठीत होण्यास विलंब लागणार होता.

६. तसेच शै. वर्ष २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेश व पात्रता अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरु झालेली होती. पात्रता अर्ज स्विकारण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची माहिती महाराष्ट्र स्टेट बोर्ड,

पुणे यांच्याकडे अग्रेषित करुन त्याची पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच विद्यार्थ्यांची अंतिम पात्रता करावी लागणार आहे व तद्नंतर महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांना प्रती विद्यार्थी रु. १०/- याप्रमाणे बिल आदा करावे लागणार होते.

७. यास्तव नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची सभा होणार नसल्याने व नवीन व्यवस्थापन परिषद गठीत होण्यास विलंब लागणार असल्याने, शै.वर्ष २०२२-२३ पासून संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात प्रथम वर्षास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची पदवी अभ्यासक्रमाची पात्रता कामी पडताळणी महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांच्याकडून प्रती विद्यार्थी रु. १०/- प्रमाणे करुन घेण्यास व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदया यांनी त्यांच्या अधिकारात मान्यता दिलेली आहे.

सबब, मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | शै.वर्ष २०२२-२३ पासून संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात प्रथम वर्षास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची पात्रता कामी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तपशील महाराष्ट्र स्टेट बोर्ड, पुणे यांच्याकडून प्रति विद्यार्थी रु.१०/- प्रमाणे करुन घेण्यास, मा.कुलगुरु महोदया यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.५ डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये विद्यापीठ वर्धापनदिनी प्रदान करण्यात येणाऱ्या "डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती" साठी गतवर्षी ठेवलेल्या देणगीमध्ये अधिकचे रु.१,००,०००/- धनादेश क्र.१३९११५ द्वारे विद्यापीठास दि.२९/०७/२०२२ रोजी दिले आहे. सदर देणगी स्विकारण्याबाबत मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: डॉ. बी. वाय. यादव यांनी दि.२९/०७/२०२२ रोजीच्या पत्रांन्वये डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्तीसाठी मिळणाऱ्या व्याजाची रक्कम त्रोटक असल्याने सदर शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्याला भरघोस रक्कम मिळण्यासाठी त्यांनी सदर शिष्यवृत्तीच्या निधीमध्ये भर घालण्यासाठी धनादेश क्र. १३९११५, रु.१,००,०००/- विद्यापीठास दिला आहे.

कोणतीही देणगी स्वीकारण्याचा अधिकार व्यवस्थापन परिषदेस आहे. परंतु, नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याकारणाने अभ्यासमंडळे विभागाच्या दि.०२/०८/२०२२ रोजीच्या टिपणीवर मा.कुलगुरु यांनी सदर बाब तातडीची असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) या तरतूदीनुसार सदर देणगी स्वीकारण्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केली आहे.

सदर धनादेश पावती क्र.८७३७, दि.०८/०८/२०२२ रोजी विद्यापीठातील वित्त व लेखा विभागात डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती या पारितोषिका करिता जमा करण्यात आली आहे.

सबब, डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये विद्यापीठ वर्धापन दिनी प्रदान करण्यात येणाऱ्या "डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती" साठी गतवर्षी ठेवलेल्या देणगीमध्ये अधिकचे रु.१,००,०००/- धनादेश क्र.१३९११५ द्वारे विद्यापीठास दि.२९/०७/२०२२ रोजी दिले आहे. सदर देणगी स्विकारण्याबाबत मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये विद्यापीठ वर्धापनदिनी प्रदान करण्यात येणाऱ्या "डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती" साठी गतवर्षी ठेवलेल्या देणगीमध्ये अधिकचे रु.१,००,०००/- धनादेश क्र.१३९११५ द्वारे विद्यापीठास दि.२९/०७/२०२२ रोजी दिले असून, सदर देणगी स्विकारण्यास मा. कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.६ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या वास्तुशास्त्र (Architecture) महाविद्यालयातून Bachelor of Architecture या पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील "Project Architecture Design Thesis" या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्ण पदक "कै. तुकाराम लक्ष्मण कोटा व कै. चंद्रमा तुकाराम कोटा यांचे स्मृती प्रीत्यर्थ सुवर्णपदक" या नावाने देण्याकरिता रु.३,१५,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.**

टिपणी: मा. श्री आर्किटेक्ट. विवेक तुकाराम कोटा, कोटा ॲन्ड असोसिएट्स आर्किटेक्ट इंजिनिअर्स इंटेरियर डिझाईनर्स, यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या Architecture महाविद्यालयातून Bachelor of Architecture या पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील "Project Architecture Design Thesis" या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून प्रत्येक वर्षी कै. तुकाराम लक्ष्मण कोटा व कै. चंद्रमा तुकाराम कोटा यांचे स्मृती प्रीत्यर्थ सुवर्णपदक देण्यासाठी दि.२२/०८/२०२२ रोजीच्या पत्रासोबत युनियन बँक ऑफ इंडिया या बॅकेचा धनादेश क्र. १००४१९४२ नुसार रु.३,१५,०००/- इतकी रक्कम देणगी स्वरुपात प्रस्तुत विद्यापीठास दिली आहे. रु.३,००,०००/- रकमेच्या व्याजातून प्रतिवर्षी सुवर्णपदक देण्यात यावे व रु.१५,०००/- ही रक्कम शै. वर्ष २०२१-२२ मध्ये दिल्या जाणाऱ्या सुवर्णपदकाच्या डायसाठी व सुवर्णपदक तयार करण्यासाठी वापरण्यात यावे, असा मानस विद्यापीठास कळविला आहे.

दरम्यान नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याने मा. श्री. व्ही. टी. कोटा सोलापूर यांच्या कडून सुवर्णपदकासाठी रु.३,१५,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख पंधरा हजार) इतकी रक्कम देणगी स्वरुपात धनादेशाद्वारे स्विकारण्यास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महादयांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.२५/०८/२०२२ रोजीच्या टिपणीनुसार मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्यात आला असून रु.३,१५,०००/- इतक्या रकमेची पावती क्र.९५७१, दि.०३/०९/२०२२ अन्वये वित्त व लेखा विभागाने अभ्यासमंडळे विभागाकडे जमा केलेली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या वास्तुशास्त्र (Architecture) महाविद्यालयातून Bachelor of Architecture या पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील “Project Architecture Design Thesis” या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून “कै. तुकाराम लक्ष्मण कोटा व कै. चंद्रमा तुकाराम कोटा यांचे स्मृती प्रीत्यर्थ सुवर्णपदक” देण्याकरिता रु.३,१५,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या वास्तुशास्त्र (Architecture) महाविद्यालयातून Bachelor of Architecture या पदवी अभ्यासक्रमातील अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील “Project Architecture Design Thesis” या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्ण पदक “कै. तुकाराम लक्ष्मण कोटा व कै. चंद्रमा तुकाराम कोटा यांचे स्मृती प्रीत्यर्थ सुवर्णपदक” या नावाने देण्याकरिता रु.३,१५,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.७ कै. श्रीवल्लभ लोणकरण चंडक व कै. कमलाबाई श्रीवल्लभ चंडक यांच्या स्मरणार्थ दरवर्षी १ ऑगस्ट रोजी संपन्न होणाऱ्या विद्यापीठ वर्धापन दिनी योग्य व्यक्तीस/संस्थेस पुरस्कार देण्यासाठी श्री. किशोर श्रीवल्लभ चंडक, अध्यक्ष, शेठ रामसुख संतोकिराम चंडक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर यांचेकडून रु.१,५१,०००/- देणगी स्विकारण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदया यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही तसेच पुरस्कार वितरण नियमावली माहितीस्तव.**

टिपणी: श्री. किशोर श्रीवल्लभ चंडक, अध्यक्ष (शेठ रामसुख संतोकिराम चंडक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर) यांनी दि.०१/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ वर्धापन दिनी योग्य व्यक्तीस/संस्थेस "कै. श्रीवल्लभ लोणकरण चंडक व कै. कमलाबाई श्रीवल्लभ चंडक यांच्या स्मरणार्थ पुरस्कार देण्यात यावा, यासाठी विकास सहकारी बॅक लि., सोलापूर या बॅकेचा रु.१,५१,०००/- चा धनादेश (चेक नं. ५९८४६६) प्रस्तुत विद्यापीठास सुपूर्द केला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ट) मधील व्यवस्थापन परिषदेचे अधिकार व कर्तव्ये या तरतूदीनुसार देणगी स्विकारण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेस आहेत. परंतु नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याने मा. कुलगुरु महोदयांनी तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये किशोर श्रीवल्लभ चंडक यांनी विद्यापीठास देणगी स्वरुपात दिलेला धनादेश "कै. श्रीवल्लभ लोणकरण चंडक व कै. कमलाबाई श्रीवल्लभ चंडक पुरस्कार या नावे नविन अंदाजपत्रकिय तरतूद तयार करुन वित्त व लेखा विभागास भरणा करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अभ्यासमंडळे विभागाच्या दि.०६/०८/२०२२ रोजीच्या टिपणीनुसार मान्यता प्रदान केली आहे.

त्यास अनुसरुन "कै. श्रीवल्लभ लोणकरण चंडक व कै. कमलाबाई श्रीवल्लभ चंडक पुरस्कार प्रदान करणेकामी नियमावली तयार करण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांकडून समिती गठित करण्यात आली, सदर समितीची बैठक दि.०१/०९/२०२२ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर समितीने पुरस्कार प्रदान करण्यासाठी नियमावली तयार करुन विद्यापीठास सादर केली आहे. सदर नियमावली अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

सबब, किशोर श्रीवल्लभ चंडक यांनी विद्यापीठास देणगी स्वरुपात दिलेला धनादेश क्र.५९८४६६, रु.१,५१,०००/- स्विकारण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही तथा पुरस्कार वितरणाबाबत समितीने तयार केलेली नियमावली माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **कै. श्रीवल्लभ लोणकरण चंडक व कै. कमलाबाई श्रीवल्लभ चंडक यांच्या स्मरणार्थ दरवर्षी १ ऑगस्ट रोजी संपन्न होणाऱ्या विद्यापीठ वर्धापन दिनी योग्य व्यक्तीस/संस्थेस पुरस्कार देण्यासाठी श्री. किशोर श्रीवल्लभ चंडक, अध्यक्ष, शेठ रामसुख संतोकिराम चंडक चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर यांचेकडून रु.१,५१,०००/- देणगी स्विकारण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदया यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची तसेच पुरस्कार वितरण नियमावलीची नोंद घेण्यात आली. तसेच पुरस्कार म्हणून सोन्याची नाणी देण्याबाबत ठरले.** |

विषय क्र.८ शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक सर्वसमावेशक योजनेस अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाची (अल्पकालिन) वार्षिक योजनेच्या अनुषंगाने जाहीर निवेदन प्रसिध्द केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठीच्या अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निवेदनांची/प्रस्तावांची छाननी करुन त्याचा अहवाल शासनास सादर करणेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७ (१) मधील तरतूदीनुसार अधिष्ठाता मंडळाने बृहत आराखडा तयार करुन मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे. तथापि, व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्याने व शासनास तातडीने सादर करावयाचे असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.

टिपणी: मा. अ. म. बाविस्कर, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.०६/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२३-२४ या वार्षिक सम्यक योजनेचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत २५ जुलै २०२२ पूर्वी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करावेत, असे नमूद करुन कळविले होते. त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक सर्वसमावेशक योजनेस अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाची (अल्पकालीन) वार्षिक योजना तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वेगवेगळया संस्थेचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणप्रेमी व सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करुन, विद्यापीठाच्या शैक्षणिक बृहत आराखडया संदर्भात काही सूचना अथवा नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था सुरु करण्यासाठीचे किंवा नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरु करणेबाबत निवेदने मागविण्याकरिता विविध वर्तमानपत्रात जाहीर निवेदन प्रसिध्द करुन दि. २०/०७/२०२२ पर्यंत निवेदने मागविण्यात आली. सदर जाहीर निवेदनास अनुसरुन नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था सुरु करण्यासाठीचे किंवा नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया किंवा सॅटॅलाईट केंद्रे सुरु करणेबाबत प्राप्त झालेल्या निवेदनांची/प्रस्तावांची दिनांक २१/०७/२०२२ रोजी छाननी समिती नियुक्त करुन सदर प्राप्त निवेदनांची छाननी करण्यात आली.

उपरोक्त गठित छाननी समितीचा अहवाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७ (१) मधील तरतूदीनुसार अधिष्ठाता मंडळाकडून बृहत आराखडा तयार करणेकामी दिनांक २५/०७/२०२२ रोजी होणाऱ्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर करुन बृहत आराखडा तयार करण्यात आला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७(१) मधील तरतूदीनुसार अधिष्ठाता मंडळाने तयार केलेला बृहत आराखडा (सम्यक योजना) व्यवस्थापन परिषदेमार्फत विद्यापरिषद व अधिसभा यांच्याकडे सादर करुन शासनास सादर करावी लागते. तथापि, शासनाने दि.०६/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२३-२४ या वार्षिक सम्यक योजनेचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत २५ जुलै २०२२ पूर्वी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करावेत, असे आदेशित केल्यानुसार व व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने तातडीची बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक सर्वसमावेशक योजनेस अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाची (अल्पकालिन) वार्षिक योजनेच्या अनुषंगाने जाहीर निवेदन प्रसिध्द केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठीच्या अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निवेदनांची/प्रस्तावांची छाननी करुन त्याचा अहवाल शासनास सादर करणेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७ (१) मधील तरतूदीनुसार अधिष्ठाता मंडळाने बृहत आराखडा तयार करुन मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे. तथापि, व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्याने व शासनास तातडीने सादर करावयाचे असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक सर्वसमावेशक योजनेस अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाची (अल्पकालिन) वार्षिक योजनेच्या अनुषंगाने जाहीर निवेदन प्रसिध्द केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठीच्या अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निवेदनांची/प्रस्तावांची छाननी करुन त्याचा अहवाल शासनास सादर करणेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७ (१) मधील तरतूदीनुसार अधिष्ठाता मंडळाने बृहत आराखडा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र.९ **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता अंतिम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्थांकडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनास शिफारस करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून कुलगुरु यांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १५/०७/२०२२ निर्णय क्र. मान्यता-२०२२/(११४/२२)(१)/मशि-४ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रस्तावित ०३ नवीन महाविद्यालयांस शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर इरादापत्र मंजूर केले आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या दि.१९/०४/२०२२ च्या सुधारित राजपत्रातील आदेशानुसार नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव दि. ३१/०७/२०२२ पूर्वी शासनास सादर करावेत, असे निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम इरादापत्राकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्त केलेल्या छाननी समितीची बैठक दि.२१/०७/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती (छाननी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे). तर सदर छाननी समितीकडून पात्र झालेल्या प्रस्तावाच्या ठिकाणी प्रत्यक्ष (Spot Visit) भेट देवून अहवाल सादर करणेबाबत तज्ज्ञ समितीची नियुक्ती करण्यात आली होती. समितीने दि.२३/०७/२०२२ रोजी सादर केलेला तज्ज्ञ समितीचा अहवाल दि.२५/०७/२०२२ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत, अधिष्ठाता मंडळाने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.८ मधील तरतूदीनुसार गठित छाननी समितीचा अहवाल अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळाकडून कुलगुरु महोदयांना सादर केला जातो. तसेच मुद्दा क्र. ३.९ मधील तरतुदीनुसार तज्ज्ञ समितीकडून प्राप्त झालेला अहवालही अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळाकडून कुलगुरु यांना सादर करुन व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर करुन सदरील पात्र प्रस्ताव शासनास सादर केले जातात.

तथापि, नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्याने, तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या दिनांक १९/०४/२०२२ च्या सुधारित राजपत्रातील आदेशानुसार नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव दिनांक ३१/०७/२०२२ पूर्वी शासनास सादर करावेत असे निर्देश असल्याने, तातडीची बाब म्हणून कुलगुरु यांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये मान्यता दिली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता अंतिम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्थांकडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनास शिफारस करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता अंतिम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्थांकडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनास शिफारस करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१०** **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता अंतिम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्थांकडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनास शिफारस करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १६/०८/२०२२ निर्णय क्र. मान्यता-२०२२/(११४/२२)(१)/मशि-४ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रस्तावित ०४ नवीन महाविद्यालयांस शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर इरादापत्र मंजूर केले आहे. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम इरादापत्राकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्त केलेल्या छाननी समितीची बैठक दिनांक २०/०८/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. (छाननी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे.) सदर छाननी समितीकडून पात्र झालेल्या प्रस्तावाच्या ठिकाणी प्रत्यक्ष (Spot Visit) भेट देवून अहवाल सादर करणेबाबत तज्ज्ञ समितीची नियुक्ती करण्यात आली होती. समितीने दिनांक २२/०८/२०२२ रोजी सादर केलेला तज्ज्ञ समितीचा अहवाल सोबत जोडला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.८ मधील तरतूदीनुसार गठित छाननी समितीचा अहवाल अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळाकडून कुलगुरु महोदयांना सादर केला जातो. तसेच मुद्दा क्र. ३.९ मधील तरतुदीनुसार तज्ज्ञ समितीकडून प्राप्त झालेला अहवालही अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळाकडून मा. कुलगुरु महोदयांना सादर करुन व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर करुन सदरील पात्र प्रस्ताव शासनास सादर केले जातात.

तथापि, नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्यान, महाराष्ट्र शासनाकडून भ्रमणध्वनीवरील प्राप्त आदेशानुसार व तद्नंतर शासनाने दि. २०/०८/२०२२ रोजीच्या (शासन पत्र क्र. मान्यता-२०२२/(११४/२२)/मशि-४) पत्रान्वये आदेशित केल्यानुसार सदर पात्र प्रस्ताव तातडीने शासनास दिनांक २४/०८/२०२२ पर्यंत सादर करावयाचे असल्याने, तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये मान्यता दिली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता अंतिम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्थांकडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनास शिफारस करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता अंतिम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्थांकडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी शासनास शिफारस करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.११ प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: वित्त लेखा विभागाच्या दि.१४/०७/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीच्या अनुषंगाने आस्थापना विभागाने दि.१४/०७/२०२२ रोजीच्या प्रशासकीय टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदय यांची मान्यता घेवून मे. यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या., नाशिक या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करणेबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यात आला होता सदर विषयावर झालेला ठराव प्रस्तुत विभागास प्राप्त झाल्यानंतर सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठ कार्यालयास मनुष्यबळ पुरविण्यात येणाऱ्या मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद या संस्थेस त्यांच्याकडून घेण्यात येणारी सेवा समाप्त करण्यात येत असल्याबाबत दि.२८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. परंतू, मे. यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या., नाशिक यांना पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी आस्थापना विभागाकडून भ्रमणध्वनीद्वारे दि.२६/०७/२०२२ रोजी संपर्क केला असता, त्यांनी दि.२९/०७/२०२२ रोजी विद्यापीठ कार्यालयात उपस्थित राहणार आहोत असे कळविलेले होते. तद्नंतर त्यांनी दि.२९/०७/२०२२ रोजी आंम्ही दि.०१/०८/२०२२ रोजी विद्यापीठ कार्यालयात उपस्थित राहणार आहोत असे सांगितले आहे व विद्यापीठाकडे सुरक्षा ठेव म्हणून ठेवण्यात येणारी रक्कम ई-निविदेमध्ये नमूद केल्याच्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम प्रथम विद्यापीठाकडे ठेवू व तद्नंतरची उर्वरित रक्कम आम्ही विद्यापीठ कार्यालयाकडे प्रथम सादर केलेल्या वेतन देयकामधून विद्यापीठाने कपात करावी असे सांगितले आहे. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमधील विषय क्र. ४७ (३) वर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने मे.यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या., नाशिक यांच्यासोबत पुरवठा आदेश देणे, करारनामा करणे व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

त्याअनुषंगाने प्रस्तुत विभागाने दि. २९/०७/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये मे.यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक यांच्याकडून सुरक्षा ठेव जमा केलेली नाही आणि सुरक्षा ठेव जमा केल्याशिवाय पुरवठा आदेश देणे उचित ठरणार नाही त्यामुळे मे.यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक यांनी वेळेत सुरक्षा ठेव जमा न केल्यास त्यांना पुरवठा आदेश देता येणार नाही. त्यामुळे दि.०१/०८/२०२२ पासून त्यांच्याकडून मनुष्यबळ पुरवठा घेता येणार नाही त्यामुळे अडचण निर्माण होऊन कंत्राटी कर्मचारी यांच्या वेतनाबाबत प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दि.२८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मे.ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना दि.३०/०७/२०२२ पासून सेवा समाप्त करण्यात आल्याचे कळविण्यात आलेले आहे. परंतू, मे.यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक यांच्यासोबत करारनामा करण्यास काही अवधी लागणार असल्याने मे.ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा.लि., औरंगाबाद यांना दि.३०/०७/२०२२ पासून सेवा समाप्त

ऐवजी दि.०६/०८/२०२२ असे वाचावे असे पत्रान्वये कळविण्याबाबत मा. कुलगुरु महोदय यांची मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मान्यता घेवून त्याप्रमाणे मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा.लि., औरंगाबाद यांना दि.२९/०७/२०२२ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. तद्नंतर दि.३०/०७/२०२२ रोजीच्या पत्राने मे. यशोधरा महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, नाशिक यांनी सुरक्षा रक्कम भरण्यापासून सूट न मिळाल्यास सेवा देण्यास आंम्ही असमर्थ आहोत असे कळविलेले असून सदरची बाब दि.०२/०८/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये प्रशासनासमोर सादर केलेले आहे. परंतू, सुरक्षा रक्कम विद्यापीठाकडे ठेवणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबत देण्यात आलेली मूदतवाढ दि.०५/०८/२०२२ रोजी संपणार आहे व उपरोक्त कार्यवाही करण्यास काही अवधी लागणार असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्तीवर मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना मूदतवाढ देणे व सदर बाबीसाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू, नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित नसल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदया यांची व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घेवून मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना दि.०४/०८/२०२२ च्या पत्रान्वये नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु असल्याने दि.०६/०८/२०२२ पासून एक महिना अथवा नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देण्यात आल्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१२ प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्‌अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: आस्थापना विभागाकडून दि.१८/०८/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये वित्त व लेखा विभागाने व दि.०६/०८/२०२२ व दि.१७/०८/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये कळविल्यानुसार मे.राजश्री शाहू नागरी सेवा सहकारी संस्था मर्या., पालघर या फर्मसोबत प्रथमत: मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भातील पुरवठा आदेश देणेबाबत, भारतीय गैरन्यायिक मुद्रांक रुपये ५०० वर करारनामा व अनामत रक्कम भरुन घेण्यासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्याबाबतच्या बाबीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच सद्य:स्थितीत प्रस्तुत विद्यापीठास मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांच्याकडून घेण्यात येणारी मनुष्यबळ सेवा घेण्याची मुदत दि.०५/०९/२०२२ पर्यंत आहे. परंतू, नजिकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक नियोजित नसल्याने व सद्यस्थितीत पुरवठा आदेशासंदर्भातील कार्यवाही करणे आवश्यक असल्याने तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदय यांची मान्यता घेण्यात आली होती. तसेच दि.२२/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मे. राजश्री शाहू नागरी सेवा सहकारी संस्था मर्या., पालघर यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी मनुष्यबळाची सेवा पुरविण्याबाबतच्या ई-निविदा नियमावलीमध्ये नमूद केलेली सुरक्षा ठेव व करारनामा करणेबाबत तसेच ई-निविदाच्या नियमावलीतील ६. SECURITY DEPOSIT यामध्ये नमूद केल्याप्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम रु.२१,००,०००/- (अक्षरी एकवीस लाख रुपये फक्त) विद्यापीठातील वित्त व लेखा विभागाकडे दि.२४/०८/२०२२ पर्यंत जमा करण्यात यावी व सदरची रक्कम जमा केल्याची पावती आस्थापना विभागास सादर करण्यात यावी व तद्‌नंतर करारनामा करण्यात येईल असे कळविण्यात आलेले होते.

तद्‌नंतर मे. राजश्री शाहू नागरिक सेवा सहकारी संस्था लि., पालघर यांनी दि.०१/०९/२०२२ रोजीच्या ईमेलने आमची संस्था ही सहकार कायद्याअंतर्गत नोंदणीकृत असून शासन निर्णयानुसार आम्हाला सुरक्षा अनामत रक्कम भरणेपासून सूट देण्यात आलेली आहे. तरी आपणाकडून सदर रक्कम भरणे आवश्यक आहे असे सांगण्यात आले आहे. जर आम्हाला सुरक्षा अनामत रक्कम भरणेपासून सूट दिली तर आम्ही काम करण्यास तयार आहोत अन्यथा सदर सेवा देण्यासही पुढील एजन्सीला जरी हे काम करण्याची संधी दिली तरी आमची काही हरकत नाही अशी विनंती केली. त्यानुसार प्रस्तुत विभागाकडून दि.०२/०९/२०२२ रोजी मा. कुलगुरु महोदय यांच्यासमोर प्रशासकीय टिपणी सादर करण्यात आली. त्यामध्ये ई-निविदाच्या नियमावलीमध्ये सुरक्षा ठेव रक्कम विद्यापीठाकडे जमा करणे आवश्यक असल्याने व इतर अनुषंगिक बाबीबाबत व मे. राजश्री शाहू नागरिक सहकारी संस्था लि. पालघर यांनी केलेली विनंती अमान्य करण्याची बाब व सद्यस्थितीत मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबत देण्यात आलेली मूदतवाढ दि.०५/०९/२०२२ रोजी संपणार

आहे व सदर टिपणीमध्ये नमूद केलेली कार्यवाही करण्यास काही अवधी लागणार असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे वित्त व लेखा विभागाने दि.०६/०८/२०२२ अन्वये कळविल्यानुसार तज्ज्ञ समितीच्या अहवालातील क्रमवारीनुसार १ व २ असलेल्या फर्मने मनुष्यबळाची सेवा देण्यास असमर्थता दर्शविली असल्यामुळे सदर समितीच्या ठराव क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समितीने निश्चित केलेल्या क्रमावारीमधील क्र.३ असलेले मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या फर्मला प्रस्तुत विद्यापीठामध्ये चर्चा करण्यासाठी बोलवावे लागणार आहे व तद्नंतर पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. तरी मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर या फर्मला चर्चा करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठात बोलविण्याची बाब व मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना देण्यात आलेली मूदत दि.०५/०९/२०२२ रोजी संपणार असल्यामुळे नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्तीवर मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना मूदतवाढ देणे व सदर बाबीसाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू, दरम्यानच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित नसल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच त्याअनुषंगाने संबंधित कंत्राटदारास दि.०६/०९/२०२२ पासून एक महिना अथवा नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मूदतवाढ देण्यात येत आहे असे दि.०५/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

तद्नंतर वित्त व लेखा विभागाने कळविल्यानुसार L३ असलेले फर्म मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. नागपूर यांना विद्यापीठात मनुष्यबळाची सेवा पुरविण्याबाबत चर्चा करण्यासाठी ०६/०९/२०२२ रोजी बोलविण्यात आले होते व त्यानुसार ते विद्यापीठात उपस्थित होते. त्यानुसार त्यांच्याकडून कंत्राटी मनुष्यबळाची सेवा घेण्याबाबत, विद्यापीठ कार्यालयाकडे सुरक्षा ठेव जमा करुन घेणेबाबत व करारनामा करण्याबाबतची कार्यवाही सद्यस्थितीत चालू आहे सदरची बाब आपल्या माहितीस्तव.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर

विषय क्र.१३ **प्रस्तुत विद्यापीठास मा. कुलगुरु महोदयांच्या अथक प्रयत्नाने "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र" स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय क्र. अध्यासन-२०२१/प्र.क्र.१००/विशि-२ दि. २७ जून, २०२२ अन्वये रु. ३ कोटी मंजूर केल्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तदानुषंगिक तरतूदीनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यते अन्वये या कार्यालयाचेजा.क्र.:पुअहोसोविसो/ शै.सं.व.वि./ २०२०/७२४५, दि. २० ऑगस्ट, २०२० अन्वये शासनास सर्वकष प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

तद्नंतर मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या स्तरावरुन वारंवार पाठपुरावा केला होता. शासनाने सदर पाठपुराव्याची उचित नोंद घेवून दि. २७ जून, २०२२ च्या शासन निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी रु. ३ कोटी मंजूर केले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास मा. कुलगुरु महोदयांच्या अथक प्रयत्नाने "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र" स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय क्र. अध्यासन-२०२१/प्र.क्र.१००/विशि-२ दि. २७ जून, २०२२ अन्वये रु. ३ कोटी मंजूर केल्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठास मा. कुलगुरु महोदयांच्या अथक प्रयत्नाने "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र" स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय क्र. अध्यासन-२०२१/प्र.क्र.१००/विशि-२ दि. २७ जून, २०२२ अन्वये रु. ३ कोटी मंजूर केल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

**विषय क्र.१४ प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये गठीत करण्यात येणाऱ्या Selection Committee मधील क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीच्या पदोन्नतीकरिता प्राप्त प्रस्तावांची मा. कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या छाननी समितीकडून पडताळणी होऊन छाननी समिती अहवाल विभागास प्राप्त झाला आहे.

पुढील प्रक्रियेसाठी सदर कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये निवड समिती (Selection Committee) गठित होणे आवश्यक असून, निवड समितीमधी क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची तरतूद आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये गठीत करण्यात येणाऱ्या Selection Committee मधील क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत अध्यापकांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये गठीत करण्यात येणाऱ्या Selection Committee मधील क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्यास सर्वानुमते मा.कुलगुरु महोदयांना सर्वाधिकार देण्यात आले.** |

**विषय क्र.१५ विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२० -२१ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी.डी. स्वरुपात) तयार केलेला १७ वा वार्षिक अहवाल विचारार्थ**

टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा १७ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. संतोष वि. कोटी | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. शंकर द. नवले | उपाध्यक्ष |
| ३) | उपप्राचार्या डॉ. श्रीमती वंदना पुरोहीत | सदस्य |
| ४) | डॉ. श्रीमती अंजना सं. लावंड | सदस्य |
| ५) | डॉ. श्रीराम द. राऊत | सदस्य |
| ६) | श्री. मुकतार म. शेख | सदस्य - सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासकीय विभागाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करुन वेळोवेळी अहवाल समितीच्या बैठका आयोजीत करुन सदरचा मराठी व इंग्रजी भाषेतील अहवाल (पुस्तक स्वरुपात) तयार करुन दि. २३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या टिपणी नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा १७ वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेकडे सादर करण्याची शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी नंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १३६(१) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम १३६ (१) | अधिष्ठाता मंडळ, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ, त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्रशासनिक, विद्याविषयक संशोधन व विकासविषयक व अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल तयार करील व तो विचारार्थ व्यवस्थापन परिषदेला सादर करील. व्यवस्थापन परिषदेकडून मिळालेल्या वार्षिक अहवालावर अधिसभा चर्चा करील व तो मान्य करील. अधिसभेने मान्य केलेला असा अहवाल, कुलपती व राज्य शासन यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल. |

सबब, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी.डी. स्वरुपात) तयार केलेला १७ वा वार्षिक अहवाल विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२० -२१ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी.डी. स्वरुपात) तयार केलेला १७ वा वार्षिक अहवाल दुरुस्तीसह स्विकारुन अधिसभेच्या मान्यतेसाठी ठेवण्यास शिफारस करण्यात आली.** |

**विषय क्र.१६ विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक / सी.डी. स्वरुपात) तयार केलेला १७ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १३६(१) तरतूदीनुसार, विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा १७ वा वार्षिक अहवाल मराठी व इंग्रजी भाषेत तयार करण्यात आला असून, सदर अहवाल दि. २३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या टिपणीच्या वतीने व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

सदरचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा १७ वा मराठी व इंग्रजी वार्षिक अहवाल आगामी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा १७ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक / सी.डी. स्वरुपात) तयार केलेला १७ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदस्यांचे नामनिर्देशन करण्यास सर्वानुमते मा. कुलगुरु महोदयांना सर्वाधिकार देण्यात आले.** |

**विषय क्र.१७ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.२८/०९/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५(२) नुसार, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या मान्येतेने नियुक्ती करण्यात आली होती. M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे.

लेखापरिक्षीत लेखे, लेखापरिक्षण अहवाल व त्याचा पुर्तता अहवाल दि.२८/०९/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे मान्यतेची शिफारस करण्यात आली.

ठराव:- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) नुसार सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पुर्तता अहवाल स्विकारुन व मान्यता देवुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, वित्त व लेखा समितीने वरीप्रमाणे केलेली मान्यतेची शिफारस विचारात घेऊन, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पुर्तता अहवाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार स्विकारुन मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६)(क) व ३१(यघ) नुसार, सन २०२१-२२ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.२८/०९/२०२२ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१८ परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले छापील स्टेशनरी छपाई करुन घेण्यासाठी वार्षिक दरकरार करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: परीक्षा व मूल्यमापन विभागास विद्यापीठीय परीक्षाकरीता लागणारी विविध छापील स्टेशनरी वार्षिक दरकरार करुन घेण्यासाठी दरपत्रकांची प्रक्रिया केद्रीय खरेदी (भांडार) या विभागानी केली असून पात्र ठरलेले दरपत्रकधारक खालीलप्रमाणे.

| अ.क्र | दरपत्रकधारकांचे नाव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १) | मे. सचिन ऑफसेट, सोलापूर | पात्र |
| २) | मे. रुपेश स्क्रिन, सोलापूर | पात्र |

वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या दोन निविदाधारकांच्या दराच्या निविदा दि.१७/०८/२०२२ रोजी समिती समक्ष उघडून न्युनतम दराचा तौलनिक तक्ता तयार केला असून तौलनिक तक्ता सोबत अवलोकनार्थ जोडला आहे. फर्म आणि त्यांनी दिलेल्या न्युनतम दराचा तपशील सोबत जोडला असून उपरोक्त प्रमाणे छपाई खर्च हा परीक्षा विभागाकडील “Other Printing Expenses” या अंदाजपत्रकिय शिर्षकातून खर्ची पडणार आहे. तरी वरीलप्रमाणे दोन्ही फर्मसोबत एका वर्षाकरीता वार्षिक दरकरार करुन कामाचे आदेश देण्याची बाब विचारार्थ.

| ठराव : | **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले छापील स्टेशनरी छपाई करुन घेण्यासाठी वार्षिक दरकरार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

## मा.कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय

विषय क्र. १९(१) **मुलांचे व मुलींचे वसतिगृह प्रवेश शुल्क निश्चिती समितीने दिलेला अहवाल स्वीकारुन, सदर अहवालाप्रमाणे प्रवेश शुल्क आकारणी करुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासुन वसतिगृह प्रवेश सुरु करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार, व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदया यांनी दिलेली मान्यता माहितीस्तव.**

टिपणी: मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यंत कमी शुल्कामध्ये विविध सुविधा पुरविण्यात येत आहेत. गेल्या १० वर्षापासुन विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि विद्यार्थ्यांकडुन घेण्यात येणारे वसतिगृह शुल्क यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत निर्माण झालेली आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि वसतिगृह शुल्क यामधील तफावत कमी करण्याकरीता मा.कुलगुरु महोदयांनी दि.१९/०७/२०२२ रोजीच्या मान्यतेनुसार वसतिगृह प्रवेश शुल्क निश्चित करण्याकरीता समिती गठीत केली होती.

१. डॉ. माया पाटील, सहा.प्राध्यापक, सामाजिकशास्त्र संकुल, पु.अ.हो.सो.वि.सोलापूर

२. डॉ. श्रीराम राऊत, सहा.प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल, पु.अ.हो.सो.वि.सोलापूर

सदर समितीने वसतिगृह प्रवेश शुल्क निश्चित करुन अहवाल दि.२५/०८/२०२२ रोजी सादर केला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

Old Hostel fee Details

| Sr. No. | Details | Particular 1st Term Hostel Admission Fee | | 2nd Term Hostel Admission Fee |
|---|---|---|---|---|
| | | Part Ist | Part IInd and IIIrd | |
| 1. | Admission fee | 100 | 100 | -- |
| 2. | Room rent | 200 | 1,200 | 1,200 |
| 3. | Hostel Sports and recreation club fee | 50 | 50 | 50 |
| 4. | Water and electricity charges | 500 | 500 | 500 |
| 5. | Hostel and lock deposit | 500 | -- | -- |
| 6. | Security charges | 50 | 50 | 50 |
| | Total | 2,400/- | 1,900/- | 1,800/- |

New Hostel Fee Details

| Sr. No. | Details | Particular 1st Term Hostel Admission Fee | | Particular 2nd Term Hostel Admission Fee | |
|---|---|---|---|---|---|
| | | Sem-1 | Sem-2 | Sem-3 | Sem-4 |
| 1. | Admission fee | 100 | -- | 100 | -- |
| 2. | Room rent | 2,400 | 2,400 | 2,400 | 2,400 |
| 3. | Hostel Sports and recreation club fee | 100 | 100 | 100 | 100 |
| 4. | Water and electricity charges | 400 | 400 | 400 | 400 |
| 5. | Hostel and lock deposit | 500 | -- | -- | -- |
| 6. | Security charges | 100 | 100 | 100 | 100 |
| | Total | 3,600/- | 3,000/- | 3,100/- | 3,000/- |

वरील प्रमाणे प्रवेश शुल्क निश्चिती समितीने दिलेला अहवाल स्वीकारुन, सदर अहवालाप्रमाणे वसतिगृह प्रवेश शुल्क आकारणी करुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासुन वसतिगृह प्रवेश सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) नुसार, व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदया यांनी दिलेली मान्यता माहितीस्तव.

| ठराव : | **मुलांचे व मुलींचे वसतिगृह प्रवेश शुल्क निश्चिती समितीने दिलेला अहवाल स्वीकारुन, सदर अहवालाप्रमाणे प्रवेश शुल्क आकारणी करुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासुन वसतिगृह प्रवेश सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार, मा.कुलगुरु महोदया यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र. १९(२)** **प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरविण्याकरिता खाजगी पुरवठादार मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: वित्त व लेखा विभागाने दि.०८/०९/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये अंतिम मुदतीमध्ये एकूण २२ ई-निविदा प्राप्त झाल्याचे संकेतस्थळावर निदर्शनास आहे. त्यानुसार एकूण २२ ई-निविदेचे Technical Bid (तांत्रिक निविदा) डाऊनलोड करण्यात आली असून त्यामधील तांत्रिक कागदपत्रांची तपासणी मा. कुलगुरु महोदया यांनी नियुक्त केलेल्या समिती सदस्य यांच्याकडून करण्यात येत आहे. समितीने तपासणी अहवाल सादर केल्यानंतर तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांची Financial Bid (दराची निविदा) उघडण्यात येऊन त्यामधून न्युनतम दर दिलेल्या कंत्राटदाराचे नाव आपणांस कळविण्यात येईल असे कळविलेले आहे.

तद्नंतर आस्थापना विभागाकडून सद्य:स्थितीत प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरवठा करणाऱ्या खासगी कंत्राटदाराची मूदत दि.३०/०९/२०२२ रोजी संपणार असल्याने वित्त व लेखा विभागास प्रस्तुत विभागाकडून दि.२६/०९/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या सेवेची मूदत दि.३०/०९/२०२२ रोजी संपणार असल्यामुळे नविन पुरवठादाराचे नाव लवकरात लवकर कळविण्यात यावे. जेणेकरुन पुढील प्रशासकीय कार्यवाही करणे सोयीचे होईल असे कळविलेले आहे. परंतु, नविन कंत्राटदाराची नियुक्त करण्यासाठी आणखी काही अवधी लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे सद्य:स्थितीतील पुरवठादार मे.एक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मूदतवाढ देणे आवश्यक आहे.

तसेच सद्य:स्थितीत मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांची सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याबाबतची मूदत दि.३०/०९/२०२२ रोजी संपणार असल्याने नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत मे. ऍक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना पूर्वीच्या सेवाशर्ती व सेवाशुल्कावर मूदतवाढ देणे व सदर बाबीसाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु, व्यवस्थापन परिषदेची बैठक दि.०७/१०/२०२२ रोजी नियोजित असल्याने व दि.३०/०९/२०२२ रोजी कंत्राटदाराची मुदत संपणार असल्यामुळे तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदय यांनी दि.२७/०९/२०२२ रोजीच्या प्रशासकीय टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारास दि.०१/१०/२०२२ पासून दि.३०/११/२०२२ या दोन महिन्याच्या कालावधीकरिता अथवा

नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देण्यात येत आहे असे दि.०१/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरविण्याकरिता खाजगी पुरवठादार मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना दि.०१/१०/२०२२ पासून दि.३०/११/२०२२ या दोन महिन्याच्या कालावधीकरिता अथवा नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरविण्याकरिता खाजगी पुरवठादार मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना मुदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. १९(३)** | **दि.०५/०८/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाहीची बाब माहितीस्तव.** |

टिपणी: दि.०५/०८/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे

सदर बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यासाठी बैठकीची तारीख नियोजित नव्हती. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्तांत प्राप्त झाल्यानंतर त्यापुढील प्रशासकीय कार्यवाहीसाठी अंदाजे ०२ ते ०३ महिन्याचा कालावधी लागणार होता. सदर इतिवृत्तांतानुसार विविध कामासाठीचे ई-निविदा प्रक्रिया करणे आवश्यक होते. तसेच मक्तेदारांचे देयक अदा करणे गरजेचे होते. विद्यापीठ परिसरातील विविध बांधकामाच्या कामासाठीचे मक्तेदारांकडून प्रत्यक्षात अथवा दूरध्वनीद्वारे देयकाबाबत वेळोवळी विचारणा होत होती. मक्तेदारांचे देयक वेळेत देणे आवश्यक होते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १००(५)(ग) नुसार नमुद केलेली तरतुदी विचारात घेता, सर्व लहान आणि मोठ्या बांधकामाच्या संदर्भात, व्यवस्थापन परिषदेस शिफारस करील आणि प्रशासकीय मान्यता आणि खर्चास मंजुरी देण्याची बाब इमारत व बांधकाम समितीची असल्याने नमुद केले आहे.

व्यवस्थापन परिषदेचे अध्यक्ष हे मा. कुलगुरु महोदय आहेत. त्यामुळे निकडीची बाब असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी व विविध मक्तेदारांचे देयक आदा करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, दि.०५/०८/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाहीची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **दि.०५/०८/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

विषय क्र. १९(४) **प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: आस्थापना विभागाच्या दि.०२/०९/२०२२ रोजीच्या मान्य टिपणीच्या अनुषंगाने मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना दि.०६/०९/२०२२ पासून एक महिना अथवा नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी आपणांस पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मूदतवाढ दि.०५/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. तद्नंतर मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांनी दि.०८/०९/२०२२ रोजीच्या ईमेलन्वये केलेल्या विनंतीनुसार प्रस्तुत विभागाकडून दि.१२/०९/२०२२ रोजी प्रशासकीय टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदय यांची मान्यता घेवून व दि.१६/०९/२०२२ रोजी पत्राच्या मसूद्यान्वये मान्यता घेवून तसे मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांना दि.१७/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तद्नंतर मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर यांनी दि.१९/०९/२०२२ रोजीच्या ईमेलन्वये Bank Guarantee चा मसूदा विद्यापीठ कार्यालयाकडे सादर केलेला असून तो तपासून त्यामध्ये काही दुरुस्त्या असतील तर त्या कळविण्यात याव्यात असे कळविले असून त्याअनुषंगाने दि.२३/०९/२०२२ रोजी प्रशासकीय टिपणी सादर करण्यात आली आहे. सदर टिपणीवर मा. कुलसचिव यांनी आदेशीत केल्याप्रमाणे कार्यवाही करुन व कायदा अधिकारी यांनी दि.२७/०९/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये सदर Bank Guarantee मध्ये काही तरतुदी/मुद्दे समाविष्ट करुन वित्त व लेखा विभागाचे मत व मार्गदर्शन घेण्याबाबत कळविल्यानुसार त्याप्रमाणे कार्यवाही करुन दि.०३/०९/२०२२ रोजी सदर Bank Guarantee चा मसूदा व सदर मसूद्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांना कळविण्याबाबत मा.कुलगुरु महोदय यांच्यासमोर सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार संबंधितांकडून Bank Guarantee करणे व तद्अनुषंगिक प्रशासकीय कार्यवाही करणे (Bank Guarantee संबंधित बँकेकडून खातरजमा करुन घेणे, करारनामा करणे व तद्नंतर पुरवठा आदेश देणे) यासाठी काही अवधी लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यास काही अवधी लागणार असल्यामुळे व सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या

मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना देण्यात आलेली मूदत दि.०५/१०/२०२२ रोजी संपणार असल्यामुळे नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी पूर्वीच्या सेवाशर्तीवर मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना मूदतवाढ देणे व सदर बाबीसाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू, व्यवस्थापन परिषदेची बैठक दि.०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी नियोजित असल्याने व दि.०५/१०/२०२२ रोजी कंत्राटदाराची मुदत संपणार असल्यामुळे तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधित कंत्राटदारास दि.०६/१०/२०२२ पासून एक महिना अथवा नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मूदतवाढ देण्यात येत आहे असे दि.०४/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याबाबत व नविन कंत्राटदारासोबत पुरवठा आदेश, करारनामा व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा एक महिना यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांना पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मूदतवाढ देणेबाबत तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र. १९(५)** **मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांच्यामार्फत प्रस्तुत विद्यापीठात पुरविण्यात येणाऱ्या जनसंपर्क अधिकारी यांच्या एकत्रित वेतनात वाढ करण्याबाबत व वेब डेव्हलपर या पदास कुशल या प्रकारातून एकत्रित वेतनावर घेण्याबाबत संबंधित कंत्राटी कर्मचारी यांच्या विनंती अर्जानुसार संबंधित कंत्राटदार यांनी दि.१२/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ कार्यालयास केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांनी वरील दि.१२/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये वाढत्या महागाईच्या अनुषंगाने संबंधित पदावर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचारी यांनी संबंधित कंत्राटदारास जनसंपर्क अधिकारी यांनी एकत्रित वेतन रु.२०,०००/- ऐवजी रु.२५,०००/- इतके एकत्रित वेतन मिळणेबाबत व वेब डेव्हलपर यांनी कुशल या प्रकारातून एकत्रित वेतन २५,०००/- मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदाराने संबंधितांचे दोन्ही अर्ज सोबत जोडलेले असून संबंधित कंत्राटदाराने खालीलप्रमाणे वेतन वाढीबाबत व कुशल या प्रकारातून एकत्रित वेतनावर घेण्याबाबत शिफारस केलेली आहे.

| अ. क्र. | कंत्राटी पदनाम | सद्य:स्थितीतील दरमहा एकत्रित वेतन | कंत्राटदाराने शिफारस केलेले वेतन | महिन्याला पूर्वीच्या वेतनात व वाढीव वेतनातील फरक |
|---|---|---|---|---|
| १) | जनसंपर्क अधिकारी | रु.२०,०००/- | रु.२५,०००/- | रु.५,०००/- |
| २) | वेबसाईट डेव्हलपर | प्रति दिन ५२८.३८/- | रु.२५,०००/- | रु.११,२६२.१२/- (२६ दिवस ग्राह्य धरुन) |

प्रस्तुत विद्यापीठामध्ये खाजगी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्यात येतात. त्यामध्ये विविध पदनामाचे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच कंत्राटी जनसंपर्क अधिकारी व वेब डेव्हलपर हे ही पद त्यामध्ये आहे. कंत्राटी जनसंपर्क अधिकारी हे पद एकत्रित वेतनामध्ये असून सदर पदास दरमहा रु.२०,०००/- इतके वेतन आदा केले जाते. तर वेब डेव्हलपर हे पद कुशल या प्रकारामध्ये असून सदर पदास महाराष्ट्र शासनाच्या उद्योग व ऊर्जा विभागाच्या शासन निर्णयानुसार प्रतिदिन रु.५२८.३८/- या दराने वेतन आदा करण्यात येते.

तसेच सद्य:स्थितीत एकत्रित वेतनामध्ये इंन्स्ट्रूमेंट एक्सपर्ट, संगणक तज्ज्ञ, जनसंपर्क अधिकारी, प्रोड्युसर ही पदे असून त्यांना मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता

घेवून कंत्राटदारामार्फत एकत्रित वेतन आदा करण्यात येत आहे. तसेच एखाद्या पदाची जाहिरात देऊन थेट मुलाखत घेवून कंत्राटदारामार्फत नियुक्ती केली असेल व तद्अनुषंगिक मा.व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेवून संबंधित पदास एकत्रित वेतनावर घेण्यात येते. वेब डेव्हलपर यांना कंत्राटदारामार्फत जाहिरात देवून घेण्यात आलेले नाही.

सबब, मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांच्यामार्फत प्रस्तुत विद्यापीठात पुरविण्यात येणाऱ्या जनसंपर्क अधिकारी याच्या एकत्रित वेतनात वाढ करण्याबाबत व वेब डेव्हलपर या पदास कुशल या प्रकारातून एकत्रित वेतनावर घेण्याबाबत संबंधित कंत्राटी कर्मचारी यांच्या विनंती अर्जानुसार संबंधित कंत्राटदार यांनी दि.१२/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ कार्यालयास केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव :** मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांच्यामार्फत प्रस्तुत विद्यापीठात पुरविण्यात येणाऱ्या जनसंपर्क अधिकारी यांच्या एकत्रित वेतनात वाढ करण्यास व वेब डेव्हलपर या पदास कुशल या प्रकारातून खालीलप्रमाणे एकत्रित वेतनावर घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदरची वाढ दि. ०१ नोव्हेंबर, २०२२ पासून लागू करण्यात यावी असे ठरले.

| अ.क्र. | कंत्राटी पदनाम | सुधारित वाढीव एकत्रित वेतन |
|---|---|---|
| १) | जनसंपर्क अधिकारी | ₹. २५,०००/- |
| २) | वेब डेव्हलपर | ₹. २०,०००/- |

**विषय क्र. १९(६)** **मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांच्यामार्फत प्रस्तुत विद्यापीठात पुरविण्यात येणाऱ्या श्री. रोहित रेळेकर, कंत्राटी संगणक लेखनिक यांना माहे ऑगस्ट, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत एकत्रित वेतन रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) कंत्राटदारामार्फत आदा करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: सभा व निवडणूका विभागाने दि.१८/०७/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये श्री. रोहित रेळेकर कंत्राटी संगणक लेखनिक यांना माहे जुलै, २०२२ पासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रु.१५,०००/- इतके एकत्रित वेतन आदा करण्याबाबत मा. कुलगुरु महोदय यांची मान्यता घेवून कळविल्याच्या अनुषंगाने आस्थापना विभागाकडून दि.२०/०७/२०२२ रोजीच्या टिपणीवर मा. प्र. कुलसचिव यांनी आदेशीत केल्यानुसार संबंधितास माहे जुलै, २०२२ पासून रु.१५,०००/- इतके एकत्रित मानधन संबंधित कंत्राटदारामार्फत आदा करण्यात येत आहे.

तद्नंतर सभा व निवडणूका विभागाने दि.०१/०९/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये मा. कुलगुरु यांची मान्यता घेवून श्री. रोहित रेळेकर, कंत्राटी संगणक लेखनिक यांना रु.१५,०००/- ऐवजी रु.२०,०००/- इतके एकत्रित मानधन माहे ऑगस्ट, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत आदा करण्याबाबत दि.१६/०९/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये आस्थापना विभागास कळविलेले आहे.

सबब, मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांच्यामार्फत प्रस्तुत विद्यापीठात पुरविण्यात येणाऱ्या श्री. रोहित रेळेकर, कंत्राटी संगणक लेखनिक यांना माहे ऑगस्ट, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत एकत्रित वेतन रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) कंत्राटदारामार्फत आदा करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांच्यामार्फत प्रस्तुत विद्यापीठात पुरविण्यात येणाऱ्या श्री. रोहित रेळेकर, कंत्राटी संगणक लेखनिक यांना माहे ऑगस्ट, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत एकत्रित वेतन रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) कंत्राटदारामार्फत आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १९(७)** **आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना इतर विद्यापीठाप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीस देण्याबाबत अधिसभेचा ठराव पुनश्च: विचारार्थ.**

टिपणी: आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना इतर विद्यापीठाप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीस देण्याबाबत दि.२८/०९/२०२१ रोजीच्या अधिसभेचा बैठकीतील विषय क्र.९ अन्वये श्री. सचिन गायकवाड यांनी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव दि.०७ मार्च, २०२२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र.११ (१) अन्वये सादर करण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

ठराव - आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रिडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना रोख स्वरुपात बक्षीस देण्यासाठी इतर विद्यापीठाकडून सविस्तर माहिती घेवून सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

सदर ठरावानुसार चार विद्यापीठाकडून माहिती घेण्याकरीता पत्रव्यवहार करण्यात आला होता. याबाबत मुंबई विद्यापीठ, मुंबई व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून माहिती अद्याप अप्राप्त आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून विजेत्या खेळाडूंच्या संघासोबत जाणाऱ्या संघ मार्गदर्शक व व्यवस्थापक यांना रोख स्वरुपात काही देण्यात येत नाही. परंतु, त्यांना विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेली भेटवस्तू व स्मृतीचिन्हे देऊन सत्कार करण्यात येतो असे कळविले आहे. त्याचप्रमाणे स्वामी रामनांद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडून विजेत्या खेळाडूच्या संघ मार्गदर्शक व व्यवस्थापक यांना सोबत जोडलेल्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे रोख स्वरुपात रक्कम, स्मृतीचिन्ह, ब्लेजर देवून सत्कार करण्यात येतो असे कळविले आहे (सोबत पत्रे जोडली आहे).

सबब, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना इतर विद्यापीठाप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीस देण्याबाबत अधिसभेचा ठराव व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्च: विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **सदरबाबत सखोल चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, इतर बहुतांश विद्यापीठांमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना रोख स्वरुपात रक्कम देण्याची तरतूद नाही. यास्तव, अधिसभेने केलेली सदरबाबतची शिफारस सर्वानुमते अमान्य करण्यात आली.** |

| विषय क्र. १९(८) | **पंडित दीनदयाळ उपाध्याय डेंटल कॉलेज यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार (Academic MoU) करण्याची बाब विचारार्थ.** |
|---|---|

टिपणी: पंडित दीनदयाळ उपाध्याय डेंडल कॉलेज यांनी प्रस्तूत विद्यापीठाशी शैक्षणिक सहचर्य करार करण्यासाठी अनुमती मागितली आहे. सदर शैक्षणिक सहचर्य करार अंतर्गत शैक्षणिक संशोधन, स्टुडंट एक्सचेंज प्रोग्रॅम, दंत तपासणी शिबीरे आदी गोष्टी आयोजित करण्यात येणार असून याचा फायदा प्रस्तूत विद्यापीठातील सर्व विद्यार्थी तसेच कर्मचारी यांना होणार आहे. सदर सहचर्य करार हा पूर्णपणे शैक्षणिक स्वरुपात असून त्याचा फायदा विद्यापीठ त्याचप्रमाणे सदर संस्था या दोघांना होणार आहे.

सबब, पंडित दीनदयाळ उपाध्याय डेंटल कॉलेज यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार (Academic MoU) करण्याची बाब विचारार्थ.

| ठराव : | **पंडित दीनदयाळ उपाध्याय डेंटल कॉलेज यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार (Academic MoU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

| | |
|---|---|
| **विषय क्र. १९(९)** | **विद्यापीठाच्या सर्वसाधारण विजेते पदासाठीचे प्रायोजकत्व श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांना मिळण्याबाबत केलेली मागणी विचारार्थ.** |

टिपणी : प्रस्तुत विद्यापीठात दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. तसेच युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेते पद मिळविणाऱ्या महाविद्यालयास सर्वसाधारण विजेते पदाचा चषक देण्यात येतो. सदरील सर्वसाधारण विजेतेपदासाठी देण्यात येणारे चषक "कर्मवीर मामासाहेब जगदाळे सर्वसाधारण विजेतेपद" या नावाने देण्यात यावा व चषक विद्यापीठाच्या मंजूरीने तयार करुन त्यासाठी येणारा खर्च संस्था देण्यास तयार आहे, असे कळविले आहे. तरी विद्यापीठाच्या सर्वसाधारण विजेते पदासाठीचे प्रायोजकत्व श्री. शिवाजी शिक्षण प्रसारण मंडळ, बार्शी यांना मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. परंतु, सर्वच सर्वसाधारण विजेतेपदाच्या चषकाला विद्यापीठाचे नाव दिलेले असून या चषकासाठी युवा महोत्सवात सर्व सहभागी महाविद्यालयाची चुरशीची लढत असते. त्यामुळे विशिष्ठ महाविद्यालयांशी निगडित थोर पुरुषांचे नाव विद्यापीठाच्या चषकाला दिले, तर इतर महाविद्यालये ही आपआपल्या थोर पुरुषांचे नाव विद्यापीठाच्या अन्य चषकांना देण्याची मागणी करतील, असे वाटते.

सबब, श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी केलेली मागणी विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | सदरबाबत सखोल चर्चा करण्यात आली. बहुतांश सदस्यांनी असे मत मांडले की, सदर युवा महोत्सव हा विद्यापीठ आयोजित करीत असल्याने तो विद्यापीठाचा उपक्रम असून विजेत्या चषकास विद्यापीठाचे नांव देणे जास्त संकुक्तिक राहील, अंतिमत: सर्वानुमते श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेत्या चषकास "कर्मवीर मामासाहेब जगदाळे सर्वसाधारण विजेतेपद" हे नांव देण्याची केलेली विनंती अमान्य करण्यात आली. |

**विषय क्र. १९(१०)** **विद्यापीठ परिसरामध्ये असलेल्या पोस्ट ऑफिसचा भाडेपट्टा कराराचे नूतनीकरण करण्याची बाब मान्यतेस्तव.**

टिपणी: विद्यापीठ परिसरामध्ये सामाजिकशास्त्र संकुलामध्ये दि.२५-०३-२०१३ पासून पोस्ट ऑफिस कार्यरत आहे. विद्यापीठ परिसरामध्ये पोस्ट ऑफिस सुरु करण्याबाबत दि.०४/०३/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.२० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय क्रमांक एसयुएस-२०१३/प्र.क्र.९९/विशि-२ दि.१८/०९/२०१४ अन्वये महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयान्वये विद्यापीठाच्या मालकीची अंदाजे ३०० चौ.फूट जागा पोस्ट ऑफिस सुरु करण्यासाठी रुपये २१/- (अक्षरी रुपये एकवीस रुपये फक्त) दरमहा या प्रमाणे १० वर्षाकरीता भाडेतत्वावर पूर्वलक्षी प्रभावाने (दि.२५/०३/२०१३) देण्यास विद्यापीठाच्या प्रस्तावास पुढील अटीस अधिन राहून कार्योत्तर शासन मान्यता देत आहे असे नमूद केलेले आहे. त्यानुसार दि.३०/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर मंडल, सोलापूर यांच्यासोबत दि.२५/०३/२०१३ ते २४/०३/२०२३ पर्यंत (Lease Agreement) करार करण्यात आलेला असून त्याप्रमाणे मा.प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याबरोबर विद्यापीठ परिसरातील जागा पोस्ट ऑफीससाठी १० वर्षाच्या भाडे करारावर देण्यास कार्योत्तर मंजुरीचे पत्र देण्यात आलेले आहे.

मा. प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी दि.०८/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये पोस्ट ऑफीसचा करार दिनांक २४/०३/२०२३ रोजी संपणार असून त्याचे नुतनीकरण (२५/०३/२०२३ पासून) पुढील दहा वर्षासाठी करण्याबाबत कार्यवाही करावी आणि तसे या कार्यालयास उलट टपाली कळवावे असे नमूद केलेले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ मध्ये पोस्ट ऑफीसच्या भाडे कराराबाबत खालीलप्रमाणे तरतूद करण्यत आलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ कलम ८ "राज्य शासनाचे विद्यापीठावर नियंत्रण" उपकलम (ङ) नुसार नुसार विद्यापीठाची कोणतीही जागा भाडेतत्वावर देणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"स्थावर मालमत्तेची विक्री किंवा भाडेपट्टा याद्वारे, हस्तांतरण करणार नाही"

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ कलम ३१ "व्यवस्थापन परिषदेचे अधिकार व कर्तव्ये" उपकलम (ड) नुसार विद्यापीठाची कोणतीही जागा भाडेतत्वावर देणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने कोणतीही स्थावर मालमत्ता, इतर संघटनेकडे विक्रीद्वारे किंवा भाडेपट्टयाने किंवा कराराने हस्तांतरीत करणे :

परंतु, विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्याकरीता कोणत्याही आवश्यक भौतिक सुविधा पुरविण्याच्या प्रयोजनार्थ, बँक, उपाहारगृहे, डाकघर, मोबाईल टॉवर, इत्यादीसारख्या कोणत्याही स्थावर मालमत्तेचा राज्य शासनाच्या पूर्व-मान्यतेशिवाय विशिष्ट कालावधीकरिता वापर करण्याची परवानगी असेल" असे नमूद केलेले आहे.

उक्त बाब विचारात घेता, विद्यापीठाकडील जागा पोस्ट ऑफीस साठी भाडे करारानुसार हस्तांतरीत केलेली असून सदर भाडे कराराची मुदत ही दि.२५/०३/२०२३ पर्यंत आहे. मा.प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या दि.०८/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ परिसरातील पोस्ट ऑफीसच्या दि.२५/०३/२०२३ पासून पुढील दहा वर्षाकरीता भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण करण्याची बाब मान्यतेस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **सदरबाबत सखोल चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, सद्य:स्थितीत विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग व संकुलांची संख्या वाढलेली असल्याने त्यांना जागेची कमतरता भासत आहे. यास्तव, अंतिमत: सर्वानुमते असे ठरले की, विद्यापीठातील पोस्ट ऑफिससाठी दिलेल्या जागेबाबतचा पुढील भाडेपट्टा कराराचे नुतनीकरणाचा प्रस्ताव नाकारण्यात यावा.** |

| विषय क्र. १९(११) | **दि. ०३/१०/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.** |
|---|---|

टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि. ०३/१०/२०२२ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार दि. ०३/१०/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि. ०३/१०/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.

| ठराव : | **दि. ०३/१०/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र. १९(१२)** **मा. अधिष्ठाता मंडळाच्या ३० व्या बैठकीतील ठराव क्र. ११, २१(२) मधील अ.क्र.(क) व २१(७) या ठरावांच्या अनुषंगाने पीएच.डी. विद्यार्थ्याकडून प्राप्त शुल्काबाबत विद्यापीठ हिस्सा ठरविण्याकरीता गठीत समितीचा विद्यापरिषदेने स्विकारलेला अहवाल विचारार्थ.**

टिपणी: संदर्भ दि.०३/१०/२०२२ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. २९

मा. अधिष्ठाता मंडळाच्या ३० व्या बैठकीतील ठराव क्र. ११, २१(२) मधील अ.क्र. (क) व २१(७) ठरावाच्या अनुषंगाने मा. अधिष्ठाता मंडळाने पीएच.डी. विद्यार्थ्यांकडून संशोधन केंद्रांना प्राप्त शुल्कामधून विद्यापीठ हिस्सा ठरविण्याबाबत समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दिलेला अहवाल सोबत जोडला आहे. अधिष्ठाता मंडळाच्या संदर्भीय बैठकीचे ठराव पुढील प्रमाणे आहेत.

ठराव क्र.११-संशोधक विद्यार्थी यांच्याकडून जमा करून घेतल्या जाणाऱ्या शुल्कामधील प्रवेश शुल्क, नोंदणी शुल्क, प्रयोगशाळा शुल्क व ग्रंथालय ठेव या शुल्काव्यतिरिक्त जमा होणा-या शुल्काच्या ३०% रक्कम विद्यापीठाकडे वर्ग करणे अथवा सुधारित नियमावली तयार करणे यासंदर्भात मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली चारही विद्याशाखेच्या अधिष्ठातांची समिती गठित करण्यात आली. सदरील समितीने घेतलेल्या निर्णयासह सदरचा विषय पुढील बैठकीत फेरसादर करावा असे सर्वानुमते ठरले.

ठराव क्र. २१(२)-अ.क्र.(क)-पेट ७ मध्ये काही विषयांचे संशोधन केंद्र देण्यात आले आहे. परंतू त्या विषयाचे अध्यापन विद्यापीठात केले जात नाही, असे विषय व ज्या विषयांचे संशोधन केंद्र महाविद्यालयामध्येही नाही अशा विषयास प्रवेशित विद्यार्थ्यांना संशोधन केंद्र म्हणून विद्यापीठ/महाविद्यालय दिले असेल तर, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश फी ही विद्यापीठ/महाविद्यालयीन संशोधन केंद्र व मार्गदर्शकाचे महाविद्यालय यांच्यामध्ये विभागण्यासाठी गठित समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे सर्वानमुमते ठरले.

ठराव क्र. २१(७)- संशोधक मार्गदर्शक ज्या संशोधन केंद्राशी संबंधीत आहेत त्या संशोधन केंद्रावर संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांचे पूर्ण शुल्क भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच संशोधन केंद्रावर जमा होणाऱ्या संपूर्ण फी चा विनियोग कसा

करावा यासंदर्भात नियमावली तयार करण्याकरिता तज्ञ समिती गठित करण्या सर्वानमुमते मान्यता देण्यात आली.

उपरोक्त ठरावानुसार मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यतेखाली गठित सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता यांच्या समितीची बैठक दि. २७/०७/२०२२ रोजी होवून सदर बैठकीमध्ये उपरोक्त विषयांबाबतचा अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, नजीकच्या काळामध्ये मा. अधिष्ठाता मंडळाची बैठक नसल्याने मा.अधिष्ठाता मंडळाच्या ३० व्या बैठकीतील ठराव क्र. ११,२१(२) अ.क्र. क,२१(७) नुसार गठीत समितीचा अहवाल स्विकारून मा. अधिष्ठाता मंडळाच्या वतीने स्विकारून मा.विद्यापरिषदेच्या विचारार्थ मांडला असता, सदर अहवाल मा. विद्यापरिषदेने स्विकारून मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठेण्याबाबत शिफारस केली आहे.

सबब, मा. अधिष्ठाता मंडळाच्या ३० व्या बैठकीतील ठराव क्र. ११,२१(२) अ.क्र. क,२१(७) या ठरावाच्या अनुषंगाने पीएच.डी. विद्यार्थ्याकडून प्राप्त शुल्काबाबत विद्यापीठ हिस्सा ठरविण्याकरीता गठीत समितीचा मा. विद्यापरिषदेने स्विकारलेला अहवाल मा.व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **पीएच. डी. विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्काबाबत विद्यापीठ हिस्सा ठरविण्याकरीता गठीत समितीचा अहवाल स्विकारुन सदर अहवालानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १९(१३)** **राधा-लक्ष्मी मोरवंचीकर स्मृती व्याख्यानमाला सुरु करण्यासाठी रु. २,००,०००/- देणगी स्वरुपात स्वीकारणेस्तव, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, औरंगाबाद यांनी आपल्या मातृत्रयी म्हणजेच राधा (आजी)-लक्ष्मी(आई) या दोघांची जन्मभूमी ही चिंचोली (काटी) डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, औरंगाबाद यांची ही जन्मगाव चिंचोली आहे. सदरील गाव हे विद्यापीठाच्या लगत आहे. या स्मृतीस स्मरण म्हणून, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, औरंगाबाद यांनी विद्यापीठास त्यांचे राधा (आजी) & लक्ष्मी (आई) यांच्या स्मृती प्रित्यर्थ विद्यापीठास रु. २ लक्ष धनादेश क्रमांक: २८४०९३ बँक ऑफ महाराष्ट्र देणगी स्वरुपात देऊन त्यांच्या नावे स्मृती व्याख्यानमाला सुरु करावी, असा मानस व्यक्त केला आहे.

याअनुषगांने, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व्यवस्थापन परिषदेचे अधिकार कर्तव्य कलम ३१(ट) विद्यापीठाच्या वतीने कोणताही विश्वस्तनिधी, मृत्युपत्रित दान, देणग्या आणि विद्यापीठाकडे करण्यात आलेल्या कोणत्याही जंगम, स्थावर मालमत्तेचे आणि बौध्दिक संपदेचे हस्तांतरण स्वीकारणे; अशी तरतूद आहे. सदर देणगीची रक्कम तातडीने स्वीकारुन त्याचे मुदत ठेवीत रुपांतर करणे अनिवार्य असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये सदरची देणगी स्वीकारणे बाबतची कार्यवाही मा.कुलगुरु महोदयांनी केलेली आहे.

सबब, मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव : | **राधा-लक्ष्मी मोरवंचीकर स्मृती व्याख्यानमाला सुरु करण्यासाठी रु. २,००,०००/- देणगी स्वरुपात स्वीकारणेस्तव, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र. १९(१४)** **विद्यापीठातील वर्ग १ ते ४ या संवर्गातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी दि.२९ एप्रिल, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता दिलेल्या सर्वसाधारण नियमावली, पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यामध्ये सुधारणा करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: विद्यापीठातील वर्ग १, २, ३ व ४ या संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सर्वसाधारण नियमावली व पदनिहाय कामाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या निश्चित करण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या नियमावलीस दि.२९ एप्रिल, २०११ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र.९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमावलीनुसार सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्याचे अनुपालन करणे बंधनकारक असल्याबाबत परिपत्रक क्र.आस्था/२०११-१२/२०९८, दि.१४/०६/२०११ अन्वये कळविण्यात आले होते.

सबब, विद्यापीठातील वर्ग १ ते ४ या संवर्गातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी दि.२९ एप्रिल, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता दिलेल्या सर्वसाधारण नियमावली, पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यामध्ये सुधारणा करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठातील वर्ग १ ते ४ या संवर्गातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी दि.२९ एप्रिल, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता दिलेल्या सर्वसाधारण नियमावली, पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यानुसार निर्गमित करण्यात आलेल्या दि.१४/०६/२०११ रोजीच्या परिपत्रकामध्ये प्रमाण संहिता नियम, १९८४ (स्टॅंडर्ड कोड रुल्स हॅंडबुक) यामधील तरतुदीनुसार खालील दुरुस्तीसह वर्ग १ ते ४ संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्याही पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यामध्ये काही दुरुस्त्या असतील तर, त्यामध्ये सुधारणा करुन सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>"उपकुलसचिव व त्यांचे समकक्ष अधिकारी हे त्यांचेकडील विभागांच्या सुरळीत कामकाजासाठी वैयक्तिकरित्या जबाबदार असतील, तसेच कामाच्या आवश्यकतेनुसार उपकुलसचिव हे त्यांच्या विभागातील सहा.कुलसचिव, कक्ष अधिकारी, सहा.कक्ष अधिकारी, वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिक यांना कार्यभार नेमून देतील व स्वत:च्या देखरेखीखाली स्वत: सहभागी होऊन सदरचे काम पूर्ण करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही उपकुलसचिव व त्यांचे समकक्ष अधिकारी यांची राहील, सदरचे कर्मचारी हे उपकुलसचिव यांना जबाबदार असतील". |

राष्ट्रगीतानंतर मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद